सेंन्ट्रल हिंन्दू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे,

**भोसला मिलिटरी कॉलेज,**

रामभुमी, नाशिक

दिनांक २५/०९/२०२५

# शिष्यवृत्ती विभाग

संदर्भ—१.जा.क्र.सकआ/शिक्षण/डीबीटी—पत्रव्यवहार/का—४क/२५—२६/
२७०८ दिनांक २३/०९/२०२५
२.जा.क्र.सआसकना/भासशि/फ्रीशीप/सुधा/शा.नि/२५—२६/
४२७५ दिनांक २४/०९/२०२५

- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२४-२५ एस. सी. प्रवर्गातील सर्व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून शिष्यवृत्तीचा केंद्रशासनाचा दुसरा हप्ता ६०% संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आलेला आहे.
- दुसरा हफ्ता वर्ग करण्यात आलेल्या संबंधित विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांचे बँक आधार सीडिंग नसल्यामुळे सदरील रक्कम विद्यार्थ्याला जमा होऊ शकली नाही.
- बँक आधार सीडिंग करण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना संदर्भीय पत्र १ व 2 नुसार सोबत जोडत आहे. ज्याविद्यार्थ्यांचे आधार सीडिंग नसेल त्या विद्यार्थ्यांनी त्वरित दि. ३०.०९.२०२५ पूर्वी आधार सीडिंग ची प्रक्रिया पुर्ण करावी. तसे न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात दुसरा हप्ता जमा झालेला आहे परंतु त्यांनी त्यांची येणे असलेली फी महाविद्यालयात जमा केलेली नसल्यास त्वरित महाविद्यालयाच्या लेखा विभागात जमा करावी

**प्राचार्य**
भोंसला मिलिटरी कॉलेज
रामभूमी, नाशिक-०५

महाराष्ट्र शासन
# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी-विंग, नासर्डी पुलाजवळ, नाशिक-पुणे रोड, नाशिक-४२२०११
ई-मेल acswonashik@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२५३-२९७५८००

जा.क्र.सआसकना/ भासशि/ फ्रीशीप/सुधा/शा.नि./ ४२८५ २०२५-२६ नाशिक, दिनांक २४/०९/२०२५

**परिपत्रक**

**अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादा**

**प्रति,**
**प्राचार्य (सर्व),**
**कनिष्ठ/ वरिष्ठ/ व्यवसायिक महाविद्यालये,**
**जिल्हा नाशिक.**

**विषय :- केंद्र हिस्सा ६०% वितरणाकरीता प्रलंबित विदयार्थ्यांचे आधार बँक संलग्निकृत करणेबाबत.**

संदर्भ :- मा.सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.२७०८ दि.२३/०९/२०२५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये, अनुसूचित जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांचे बँक खाते थेट आधार क्रमांकास संलग्न करण्यासाठी किंवा आधार बँक सदयस्थिती संबंधित अडचणींचे निराकरण करण्यासाठी विशेष मोहीम राबवून https://www.npci.org.in/ या वेबलिंकवरील Bharat Aadhar Seeding Enabler (BASE) प्रणालीचा वापर करावा. तसेच सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील केंद्र हिस्सा प्रलंबित असलेल्या विदयार्थ्यांचा डेटा यासोबतच्या पत्रासोबतच्या QR कोड वर उपलब्ध आहे. सदर विदयार्थ्यांचे आधार-बँक लिंक स्थिती पूर्ण करावी तदनंतर महाविदयालय स्तरावर खातरजमा करुन दि.३०.०९.२०२५ पूर्वी महाविदयालयनिहाय व विदयार्थीनिहाय माहिती संबंधित महाविदयालयाने अदययावत करावी असे निर्देश प्राप्त आहेत.

त्याअनुषंगाने संदर्भिय पत्राची प्रत यासोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. त्यामध्ये नमूद सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच सदर बाब महाविदयालयातील सर्व अनुसूचित जातींच्या विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी.

(देविदास नांदगांवकर)
**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**
**नाशिक**

शिष्यवृत्ती 2023\पत्रव्यवहार\महाविद्यालय\315

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-1
दूरध्वनी क्र. 20-26137186 ईमेल - Escholmapping@gmail.com

जा.क्र.सकआ/शिक्षण/डीबीटी-पत्रव्यवहार/का-८क/२५-२६/2708 दि. 23/०९/२०२५

<u>तात्काळ</u>

<u>अत्यंत महत्वाचे/कालमर्यादा</u>

प्रति,

सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग

सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण


**विषय: केंद्र हिस्सा ६०% वितरणाकरिता प्रलंबित विद्यार्थ्यांचे आधार-बँक संलग्निकृत करणेबाबत..**


**संदर्भ :- आयुक्तालयाचे पत्र क्रमांक 343154 दि.25.07.2025**

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येत आहे की, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून केंद्र शासनामार्फत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा केंद्र हिस्सा (60%) (दुसरा हप्ता) NSP पोर्टलद्वारे वितरीत करण्यात येत आहे. याबाबतचा केंद्रहिस्सा 60% वितरण तपशील महाडीबीटी पोर्टलवर यापुर्वी उपलब्ध नसल्यामुळे महाविद्यालय व विद्यार्थ्यांकडून क्षेत्रिय कार्यालयास तक्रारी प्राप्त होत होत्या. त्यानुषंगाने केंद्रशासनामार्फत NSP प्रणालीद्वारे केंद्रहिस्सा 60% वितरीत झालेल्या रकमेचा विद्यार्थीनिहाय तपशील महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध झालेला आहे. संबंधित माहिती महाविद्यालय लॉगिनमध्ये "Student Disbursement Report" या पर्यायाखाली जाऊन, "दुसरा हप्ता" निवडल्यास विद्यार्थीनिहाय वितरणाचा तपशील प्राप्त होऊ शकतो.

विद्यार्थ्यांच्या आधार-बँक सीडिंग अडचणीबाबत यापुर्वीच संदर्भीय पत्रान्वये सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून सर्व राज्य शासनांना कळविण्यात आले आहे की, त्यांच्या अधिनस्त असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे बँक खाते थेट आधार क्रमांकास संलग्न करण्यासाठी किंवा आधार-बँक सद्यस्थिती संबंधित अडचणींचे निराकरण करण्यासाठी <u>https://www.npci.org.in/</u> वेबलिंकवरील Bharat Aadhaar Seeding Enabler (BASE) प्रणालीचा वापर करून आधार बँक संलग्नताबाबतचे निराकरण खालीलप्रमाणे करावेत.

**https://www.npci.org.in/ → Consumer → Bharat Aadhaar Seeding Enabler (BASE)**




- **आधार सीडिंग/डिसिडिंग (Aadhaar Seeding/Deseeding):** तुमचे आधार कार्ड बँक खात्याशी जोडण्यासाठी किंवा काढण्यासाठी.
- **आधार मॅप्ड स्टेटस (Aadhaar Mapped Status):** तुमचे आधार कार्ड बँक खात्याशी लिंक झाले आहे की नाही, हे तपासण्यासाठी.
- **आधार मॅपिंग हिस्ट्री (Aadhaar Mapping History):** तुमच्या आधार जोडणीच्या मागील नोंदी पाहण्यासाठी.
- **रिक्वेस्ट स्टेटस चेक (Request Status Check):** तुम्ही केलेल्या अर्जाची सध्याची स्थिती तपासण्यासाठी.

CamScanner


तथापि, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत सुमारे ४५ हजार विद्यार्थ्यांचे बँक खाते त्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न (linked) नसल्यामुळे, केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीद्वारे शिष्यवृत्तीची रक्कम वितरित करण्यात अडचणी येत आहेत. या समस्येवर त्वरित तोडगा काढण्यासाठी, केंद्र शासनाने १७ सप्टेंबर २०२५ रोजी ई-मेलद्वारे PFMS प्रणालीद्वारे शिष्यवृत्ती न मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी राज्याला उपलब्ध करून दिली आहे.

या संदर्भात, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना लेखी सूचना निर्गमित करून, महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्याची प्रक्रिया https://www.npci.org.in/ पोर्टलवरील Bharat Aadhaar Seeding Enabler (BASE) प्रणालीद्वारे वरील सूचनांचा अवलंब करून विशेष मोहीम राबवून तातडीने पूर्ण करून घ्यावी.

तसेच, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील केंद्र हिस्सा ६०% वितरणासाठी प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचा डेटा QR कोड वर उपलब्ध आहे. यामध्ये विद्यार्थ्यांकडून https://www.npci.org.in/ प्रणालीचा वापर करून आधार-बँक लिंक स्थिती पूर्ण करावी तदनंतर महाविद्यालय स्तरावर याची खातरजमा करून, त्यांचा डेटा त्वरित या QR कोडचा वापर करून जिल्हा व महाविद्यालय निवडावा. या डेटा लिंकचा वापर करण्याकरिता Pass@123 हा पासवर्ड टाकून महाविद्यालयनिहाय व विद्यार्थीनिहाय माहिती अद्यावत करावी. जेणेकरून सदर डेटा केंद्र शासनास फेरसादर करता येईल. यामुळे, आधार संलग्न नसलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया केंद्र शासनाकडून लवकरात लवकर सुरू होईल. केंद्र शासनास अद्यावत माहिती सादर करण्याची अंतिम दि.३०/०९/२०२५ असून त्यानंतरचा डेटा NSP पोर्टलवर स्वीकारला जाणार नाही याची नोंद गांभीर्याने घ्यावी.

QR कोड गुगललेन्सद्वारे स्कॅन करावा.

Aadhaar Bank seeding Pending record



तरी, या तिन्ही बाबींवर त्वरित कार्यवाही करून संबंधित महाविद्यालयांना योग्य त्या सूचना निर्गमित कराव्यात, तसेच अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाही. याबाबत उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ आयुक्तालयास सादर करावा.

(प्रमोद जाधव)
सहआयुक्त (शिक्षण),
समाज कल्याण, आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य पुणे.

**प्रत:- कार्यवाही व माहितीस्तव**
**प्रकल्प व्यवस्थापक, महाडीबीटी तांत्रिक कक्ष महाआयटी मुंबई**

आपणास कळविण्यात येत आहे की, केंद्र हिस्सा ६०% वितरण तपशील सद्यस्थितीत "Student Disbursement Report" या पर्याय उपलब्ध असून सदर माहिती महाडीबीटी पोर्टलवरील सर्व अहवालामध्ये (DBT Dashboard, Application status wise Report, Student Login -Voucher Report,etc) यामध्ये समावेश करण्यात यावा. तसेच विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न करण्याची प्रक्रिया https://www.npci.org.in/ पोर्टलवरील Bharat Aadhaar Seeding Enabler (BASE) वर नमूद केल्याप्रमाणे सूचना महाडीबीटी पोर्टलवरील होमपेजवर ठळकदृष्टया प्रसिद्ध करण्यात यावी.

CamScanner